The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue 3; March 2024

# वारकरी भजन शैलीच्या विविध परंपरा व त्यांची वैशिष्ट्ये

**प्रा.कोकाटे सविता कांतराव**

संगीत विभाग प्रमुख

श्री.शिवाजी महाविद्यालय, परभणी

प्रस्तावना:

भारतीय काव्य साहित्य संगीत कला संस्कृती अतिशय पुरातन आहे.काव्य आणि कला, संगीत शास्त्र आणि कला वेगवेगळ्या नाहीत,काव्यात गेयता व गेयकाव्यात अपार शक्ती आहे. दोन्ही बाबी एकमेकांशी समरस होतात, तेव्हाच त्या रचना अमर होतात.गेयकाव्याचा संत,महंत,कवी, महाकाव्यकारांशी संबंध येतो.भारतमातेच्या उदरी अनेक अनेक संतकवी - कवयित्री, रचनाकार वाग्येयकार,विभुती होऊन गेल्या आहेत.त्या सर्वांनी श्रवणभक्ती,किर्तनभक्ती गान, ईशर आराधने करिता संगीत आराधना हेच मर्म,हेचतत्व,हाच खरा साधन मार्ग सांगितलेला आहे. 'वेडे वाकुडे गाईन परि तुझाची म्हणवीन'असे संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे.भक्ती मार्गाची, गेयकाव्याची नेमकी सुरुवात कशी,कोठून झाली हे सांगणे कठीण असले तरी पृथ्वीच्या उत्पत्ती पासून,वैदिककाळा पासून भक्ती मार्गाची परंपरा सुरु झाली असावी. आदि कवी महर्षि वाल्मिकींनी रामायण हे महाकाव्य रचले.ज्यात गद्य ते सहभारतीय आचार-विचार, तत्वनिष्ठा संस्कृतीची अविष्कृती कला पूर्ण आहे.महाकवी कालिदास,भवभूति,पं.जयदेव इ. नी गेयकाव्य लिहिली आहेत.पं.जयदेवांचा 'गीतगोविंद ग्रंथ'म्हणजे गीत काव्याचे प्रतिक होय, रागरागिनी युक्त ताल,लयबध्द रसभाव,परिपोष गेय काव्य ग्रंथात संगीतात्मकता आणि पांडित्य पूर्ण छंद कार्य साहित्याचा पुरेपूर समन्वय साधलेला आहे.संतकबीर,तुलसीदास, सुरदास,मीराबाई इ. आदिंनी पद रचना करून भक्ति संगीताचा महिमा वाढविला. संत श्रेष्ठनामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, गोराकुंभार, जनाबाई, मुक्ताबाई, संत नरसी मेहता, दादुदयाल, रविदास, गुरुनानक, अमृतराय, आसामातील शंकरदेव, माधवदेव, बृजभूमितील स्वामी हरीदास अशी विशाल व्यापक संत कवींची परंपरा निर्माण झाली.केवळ संत नामावली सांगणे कठीण आहे. तर त्यांचे सांगितीक कार्य किती विशाल असेल याची कल्पना करता येते. भारतीय संतांनी संगीत क्षेत्राला देणगीपात्र काव्य गुण संपन्न गीत रचना पुरविल्या. या रचना स्वतःच्या भक्ती भावाच्या आविष्कारासाठी, हितोपदेशासाठी आणि भक्त जनांना गातायाव्यात या साठी त्यांच्या हातून घडल्या आहेत, असे म्हणता येते.

विविध भजन शैली निर्माण होण्या करीता संत हे कारणीभूत ठरले. विविध प्रांताच्या, विविध समाजाच्या संतांनी प्रबोधनातून जनजागृती करण्या करीता भजन हे माध्यम निवडले व ते गाण्याकरीता त्यांनी संगीत हे माध्यम निवडले. संगीत कलेची सेवा किंवा वाङ्मय निर्मिती हे त्यांच्या जीवन कार्याचे उद्दिष्ट नव्हते तर समाजाला सन्मामार्गानी लावणे जीवनाचे सार्थक कशात आहे हे सांगणे या करीता त्यांनी संगीत हे माध्यम निवडले कारण शब्दा पेक्षा संगीत हे माध्यम जास्त प्रभावी

साधन आहे त्यांना पुर्ण जाण होती किंबहुना परमेश्वरांची भक्ती व त्याच बरोबर आध्यात्मिक ज्ञान, धर्म ज्ञान व संस्कृतीचे संवर्धन करणे तसेच प्रकार व प्रसार करणे थोडक्यात असे म्हणता येईल की, 'आत्मनामुक्तार्थ व जगहितार्थ' हे त्यांच्या जीवन कार्याचे उद्दिष्ट होते.

पौराणिक ग्रंथात आलेल्या विवेचना वरून एक प्रसंग असा आहे की, एकदा नारदाने भगवंताला प्राप्त करण्यासाठी कोणते सुलभ आहे.असा भगवंताला प्रश्न विचारला असता भगवंताने असे उत्तर दिले-

नाहम वसा मी वैकुंठे। योगी नाम हृदयव्यय।
मदभक्ता यंत्र गायंती। तंत्र तिष्ठामी नारद।

म्हणजे जे भक्ती युक्त संगीत आहे तेथेच माझे वास्तव्य आहे. संगीतात किती जादू आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे कृष्णाची बासरी कृष्ण चरित्रामध्ये याचा उल्लेख वाचायला मिळतो की कृष्णाची बासरी ऐकताच गवळणी गायीच्या ऐवजी बैलाकरवी दुध काढण्यास निघाल्यास नाकातली नथ कानात घालायला लागल्या अशी ही संगीताची जादू आहे.

संताचेकार्य गेय वाङ्मय जर नुसते वाचले तर त्याचा खुप प्रभाव पडत नाही परंतु तेच काव्य जर सहज सोप्या चालीत सर्वांना म्हणता येईल अशा पद्धतीने म्हटले तर जन सामान्यांना ते सहज म्हणता येईल. व त्याचा अर्थ ही त्यांना कळून येईल व त्यातून समाज जागृती करता येईल हे संतांनी ओळखलं होत असे जरी असले तरी संगीत शास्त्रामध्ये प्राविण्य मिळविणे व त्यांचे प्रदर्शन करणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय नव्हते, ते संगीततज्ञ होते असे सुद्धा नव्हते. आज ही खेड्या पाड्यातून ज्ञानदेवांचा हरिपाठ एका विशिष्ट चाली मध्येच समुहाने गायल्या जातो.

उभा देवाचीये द्वारी क्षणभरी।
तेणे मुक्तीचारी साधियेल्या।

हा हरिपाठाचा पहिला अभंग आहे व असा अभंग रोजच म्हटल्या जात असल्यामुळे हळुहळु त्यातील गर्भीत अर्थ हा सामान्य जनतेला कळू लागतो. निरनिराळ्या छंदामध्ये असलेल्या कविता त्या छंदाच्या चालीवरच म्हटल्या तर त्या मुखोद्गत होतात व त्यातील वाङःमय मनामध्ये प्रबळ पणे रुजते.

लता दीदींनी गायलेले पसायदान कलेच्या दृष्टीने सर्वोत्तम आहे. पण ते सर्व सामान्यांना गाता येणार नाही व त्यामुळे त्याचा शाब्दीक परिणाम पण त्यांचा मनावर होणार नाही ते फक्त ऐकतीलच परंतु ओवी या छंदात हेच काव्य सर्व सामान्यांना म्हणता येईल व त्याचा परिणाम पण त्यांच्या मनावर होईल. लता दीदींनी म्हटल्या प्रमाणे ज्ञानदेवांनी पसायदान म्हटल नसेलच कारण ते हृदयनाथांच्या एवढे पट्टीचे संगीतकार नव्हते. परंतु गद्यात

म्हटल्या पेक्षा पद्यात जर लोक संगीताचा आधार घेवून म्हटलं तर ते जास्त लोक प्रिय होवून अधिक परिणाम कारक होत हे संतांना चांगल माहित होत ओवी,श्लोक,स्तोत्र,आर्या, साकी,दिंडी, हे सर्व प्रकार लोक संगीतास निर्माण झाले आहेत असा एक समज संगीत जगतात आहे व याचा प्रकाराचा

वापर संतांनी जन जागृती करण्या करीता केला व देवऋण ऋषीऋण, पितृ ऋण,समाजऋण,यातून मुक्ती मिळविली. या करीता तुकारामाचा एक अभंग पुरावा म्हणून सांगता येईल.

काय करूम जयदेव बोलविले।
माझे खोळंबले काय होते।

काही संत थोडेफार संगीताचे जाणकार होते.संत ज्ञानेश्वर,समर्थ रामदास हे पखवाज वाजवित होते.संत निळोबा,संतनामदेव, संत तुकाराम यांना थोडे फार रागदारीचे ज्ञान होते असा उल्लेख त्यांच्या चरित्रात वाचायला मिळतो.

धन्यती गायनी कला।

असा संगीत कलेचा सन्मान आपल्या एक अभंगातून समर्थ रामदासांनी केला आहे.

भक्ती संगीताच्या विभिन्न शैली

१) वारकरी ही शैली निश्चीत कुणी निर्माण केली हे सांगता येणार नाही. परंतु या शैलीचा पाया संत ज्ञानेश्वरांनी रचला असा उल्लेख एका अभंगा वरून दिसून येतो.

ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालेस कळस जरी या संतांना संगीत थोडेफार येत होत असा उल्लेख वाचायला मिळतोत ते निश्चीत कसे गायचे या संबंधी उल्लेख कुठे वाचायला मिळत नाही व ध्वनी मुद्रीका सुद्धा उपलब्ध नाहीत, सुरुवातीला जय जय राम कृष्ण हरी हा गजर म्हणायला कारण गजर गायल्यामुळे भक्त हा परमेश्वरांशी एकरुप होतो.असा समज होता व आहे. पण या गजराची चाल एका पारंपारिक व विशिष्ट पद्धतीतीलच आहे ती १०० वारकऱ्यांना एकसाथ म्हणता येते. त्यानंतर एखादा अभंग साध्या चालीत म्हणायचा व पुढे त्यांचे शेवटचे कडवे ज्याला छाप किंवा शिक्का म्हणतात ते कडवे धुमाळी तालात व एखाद्या रागात म्हणायचा प्रघातया भजन शैली मध्ये आहे. तसेच या पद्धतीमध्ये किर्तनही एकमुख्य परंपरा आहे. संताचे विचार या कीर्तनातुन व्यक्त करण्यात येतात व त्या दरम्यान पुराव्या दाखल अनेक संतांची पदे एका विशिष्ट शैलीत गाण्याचा प्रघात आहे. कधी कधी राग दारीत सुद्धा काही कीर्तनकार ती पदे गातात.

२) सुफी संगीत - अमीर खुसरोनी या सुफी संगीताची निर्मिती केली असा उल्लेख आढळतो. ते संत तसेच संगीततज्ञ होते असा उल्लेख त्यांच्या बाबतीत वाचायला मिळतो. सुलभ जीवन जगायचं तत्व सुफी संगीतातील पदा मधून वाचायला मिळत एक सुफी कवी कैसर म्हणतो - आज जवानी कर इतरांनी वाले कल पछतायेगा।

ढलता सुरज धीरे धीरे। ढलता ही रह जायेगा।
मौत सबको आनी है । कौन इससे छुटा है।
तु फना नहीं होगा। ये ख्याल झुठा है।

३) निगुर्णी भजन संगीत - सगुणा कडून निगुर्णाकडे जाण्याचा मार्ग संत कबिरांनी सांगितला. दगडाच्या मुर्तीमध्ये रममाण होवून का ईश्वराचे खरे स्वरुप जाणून घ्याव आपल्या आत्मा हा परमात्म्याच्या आत्म्याशी एकरुप मिळवा अशी शिकवण संत कबीरांनी आपल्या काव्या तून दिली व ते

काव्य दोह्यांच्या माध्यमातून ते गात असत. ते एका ठिकाणी म्हणतात कवि राज बहम पैदा हुये। जग हसे हम रोये। जैसी करनी कर चलो की। जग रोये और हम हसे।

सुनता है गुरुम्बानी गुरूग्यानी म्यानी,
कुछले नान देता मगन रहना...

एकूणच सुफी संगीत व निर्गुणी भक्ती संगीत यांचा आशय मिळता जुळता वाटतो. संत कबीर एका ठिकाणी म्हणतात-

पत्बर पुजे भगवान मिले।
तो मै पुजु पहाड।

३) खंजेरी भजन शैली तुकडोजी महाराजांनी ही शैली निर्माण केली ते उत्तम खंजेरी वादक होते.त्यांनी आपल्या या भजन शैलीतून आध्यात्मिक सांस्कृतिक, व राष्ट्रभक्तीची जाणीव करून दिली.त्यांनी सुरुवातीला आध्यात्मीक जागृती करिता भजने लिहितात. उदा.

१) मंगलमय नाम तुझे सतत गावुदे।
२) आया हु दरबार तुम्हारे।
३) कळली का कुणाला गीता।

इत्यादी भजनांच्या ध्वनी मुद्रिका आजही त्यांच्याच आवाजात व रागदारी शैलीत ऐकावयास मिळतात.नंतर त्यांनी सिनेमा चालीवर सुद्धा भजने लिहिलीत कारण नव तरूणांना त्या चाली आवडतात म्हणून... उदा.

१) सारी सारी रात तेरी याद सताये।
या चाली वर घडी घडी मनी तुझे नाम जपावे.

२)ज्योती कलश छल के या चालीवर मंगल गुणगावो प्रभु के परंतु जेव्हा त्यांनी भारतातील इंग्रजाची जुलमी सत्ता पाहिली तेव्हा राष्ट्रजागृती व्हावी या करीता तरुण पिढीच्या मनात देशप्रेम जागविणारा सिनेमा चाली वरील देशभक्ती पर गीते लिहिलीत व गायलीत. उदा.

१) तेरी प्यारी प्यारी सुरत को...
या चालीवर मेरे सुंदर भारत को दुश्मन की नजर ना लगे
२) घट डोईवर घट कमरेवर...
या चालीवर सांभाळा धर्म ही पाळाव गैरे

या त्यांच्या कार्यामुळे इंग्रज सरकारने त्यांना तुरुंगात डांबले होते. पुढे स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारत-चीन युद्धाच्या वेळेस महाराजांना भारत चीन सिमेवर भारत सरकारने भारतीय सैनिकांना प्रोत्साहन मिळण्या करीता नेले महाराजांनी त्या ठिकाणी खालील गीत गायीले.

आवो चिनि यो मैदान में। देखो हिंद काहात।

या त्यांच्या देशभक्ती पर गीत गायनाने संबंध भारतीय सैन्य पेट्रन निघाले व पुढे चिनवर भारताने विजय प्राप्त केला. महाराजांच्या या अशा देशभक्तीपर गितांनी भारत सरकार भारावून गेले व त्यांना

राष्ट्रसंत ही पदवी बहाल केली. भक्ती संगीताच्या या विविध शैली संताच्या वाङःमय निर्मिती व संगीत उपाय योजना मुळे निर्माण झाल्या तेव्हा त्यांना भारतीय संगीतातील विविध घराणी असे संबोधल्यास वावगे होणार नाही. इतर संता चे सांगीतिक कार्य

संत सुरदासांनी सुर मल्हार या रागाची निर्मिती केली तसेच सुसागर ग्रंथाची रचना केली. राम चरित मानस ग्रंथातील छंद,चौपाही, दोहे हे ते निरनिराळ्या रागांमध्ये गात असत संत मिराबाईनी मीरा की मल्हार नावाचा राग निर्माण केला व आपल्या भक्ती पूर्ण काव्याचा प्रचार संगीत कले द्वारे केला. परंतु संगीतासाठी काव्य नाही तर काव्यातील आशय व भाव प्रभावी पणे जनमाणसांच्या मनावर बिंबावा या हेतूने त्यांनी संगीताकडे बघितले. संत कबीर त्याच दोहे एका विशिष्ट चालीत प्रभावीपणे सादर करत असत. दक्षिणे कडील संत व्यकटमुखी यांच्या सर्वच भक्ती गीतांच्या रचना रागदारीत नोटेशन सह ती तामिळ भाषेत निबद्ध आहेत. स्वामी विवेकानंद उत्तम रागदरीत भजन गात असत ते स्वतः वझे बुवांकडे गाणशिकले होते. त्यांचे बांगला भाषेतील पद चालो मन निजों निकेतनेहे पद म्हटल्यावर रामकृष्ण पर महंसांना समाधी लागत असे असा उल्लेख वाचायला मिळतो. कीर्तनकार संत नव्हेत त्यांनी उदरनिर्वाहासाठी हा व्यवसाय स्विकारला आहे मात्र हे समाज प्रबोधनसाठी संतांच्या रचना रागदारीत गातात.

संताच्या या कार्याचे विशेष

१) काही संतांनी भजनांची पुस्तके प्रसिद्ध केलीत त्यातील प्रत्येक पदावर राम व तालांचा निर्देश आढळून येतो. परंतु त्यात गायकीचा अतिरेक नाही.

२) अलीकडील काळात गायकांनी रागदारीतून संताच्या ओव्या,पदे, अभंग आकर्षीतरित्या गायल्या आहेत परंतु त्यातील भक्तीरस टिकवून राहावा म्हणून गायकीचा अतिरिक केला नाही. त्यामुळे त्यांच्या ध्वनी मुद्रीका जन सामान्यांनी अगदी डोक्यावर घेतल्यात त्यामुळे रागदारी संगीत घराघरात पोहोचले. संतांच्या या गीत लेखनामुळे गायक कलावंताची आर्थिक सोय झाली.

३)अशा रितीने संतांनी जीवन कार्य स्विकारून संस्कृतीचे संवर्धन कसे करावे या कार्याकरीता संगीताचे सुनियोजीत उपयोजन केले. कारण शब्दा पेक्षा संगीत अधिक प्रभावी आहे याची त्यांना उत्तम जाण होती.

संदर्भ ग्रंथ सूची...

१) वारकरी संप्रदायाचा इतिहास
२) निबंध संगीत - संगीत कार्यालय हाथरस
३) राष्ट्र संताची गीतमाला.
४) वारकरी संप्रदाय-म.रा.किर्तनेकर

**वारकरी भजन शैलीच्या विविध परंपरा व त्यांची वैशिष्ट्ये**

**प्रा.कोकाटे सविता कांतराव**